Date: 10/09/2024

To,
**BSE Ltd**
Phiroze Jeejeebhoy Tower,
Dalal Street Fort,
Mumbai – 400001

**Scrip code: 514330/Scrip ID: ONEGLOBAL**

**Subject: Intimation under Regulation 30 and Regulation 47 of SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulation, 2015**

Dear Sir/Ma'am,

With reference to the subject referred Regulation, we would like to inform you that the Notice of 32nd Annual General Meeting has been published in The Business Standard Newspaper in English & Tarun Bharat Newspaper in Marathi on 10th September, 2024. A copy of the said newspaper advertisements are enclosed for your reference & record.

Please take note of the following

**For ONE GLOBAL SERVICE PROVIDER LIMITED**

SANJAY UPADHAYA
Digitally signed by SANJAY UPADHAYA
Date: 2024.09.10 18:01:14 +05'30'

______________________

**Sanjay Lalbhadur Upadhaya**
**Managing Director**
**DIN: 07497306**

**Place: Mumbai**

# ‘कल्याणकरांसाठी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल’

## कडोंमपाच्या माध्यमातून गौरीपाडा येथे होणार १०० बेडचे अद्ययावत रुग्णालय

**कल्याण, दि. ९ : प्रतिनिधी**

कल्याणकरांकडून गेल्या कित्येक वर्षांपासून केली जाणारी सुसज्ज रुग्णालयाची मागणी आता पूर्ण होणार आहे. कल्याण-डोंबिवली पालिकेच्या माध्यमातून १०० बेडचे अद्ययावत सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्यात येत आहे. हे रुग्णालय उभारण्यासाठी आवश्यक असणारी कायदेशीर, तांत्रिक प्रक्रिया सुरू झाली आहे. लवकरच हे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल नागरिकांच्या सेवेमध्ये रुजू होईल, असा विश्वास आ. विश्वनाथ भोईर यांनी व्यक्त केला.

जाहीर सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या सुसज्ज रुग्णालयाबाबत कल्याणकरांना आश्वासन दिले होते. वाढती लोकसंख्या आणि या लोकसंख्येला अपुरे पडणारे कल्याण-डोंबिवली पालिकेचे रुक्मिणीबाई रुग्णालय



पाहता, शहरासाठी सुसज्ज अशा अद्ययावत शासकीय रुग्णालयाची गरज होती. ही गरज ओळखून मुख्यमंत्री शिंदे यांनी कडोंमपा प्रशासनाला असे सुसज्ज रुग्णालय उभारण्याचे निर्देश दिले. कडोंमपा प्रशासनानेही वेळ न दवडता, त्यादृष्टीने कार्यवाही सुरू केली आहे. पाहणी दौऱ्यावेळी उपायुक्त प्रसाद बोरकर, साथरोग नियंत्रण विभाग अधिकारी डॉ. प्रतिभा पानपाटील, गणेश जाधव, डॉ. धीरज पाटील, उपशहर प्रमुख अंकुश जोगदंड उपस्थित होते.

### हृदय विकारावरील उपचारांसाठी सुसज्ज कॅथलॅब

रुग्णालयासाठी गौरीपाडा परिसरात तळ + तीन मजल्यांची इमारत बांधून तयार झाली आहे. पीपीपी तत्त्वावर हे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्यात येणार आहे. इतर सर्व अद्ययावत सुविधांसह हृदय विकारावरील उपचारांसाठी सुसज्ज अशी कॅथलॅबही उभारण्यात येणार आहे. या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलसाठी सल्लागार नेमण्यात आला आहे.

### गौरीपाडा परिसरात तीन मजली इमारत

गौरीपाडा परिसरात रुग्णालयासाठी आरक्षित भूखंडावर ही तीन मजली इमारत बांधण्यात आली आहे. याठिकाणी १६ हजार चौ. फुटांहून अधिक भव्य जागेवर १०० बेडचे हे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभे राहात आहे.

### एमपीजेवाय योजनेंतर्गत मोफत उपचार...

या रुग्णालयात ‘महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजनें’तर्गत (‘आयुष्मान भारत’अंतर्गत पात्र लाभार्थी) सर्व आजारांवर मोफत, तर त्यात न बसणाऱ्या आजारांवर अत्यल्प दरांमध्ये उपचार केले जाणार आहेत. यासाठी कडोंमपाकडून संबंधित भागीदाराला ही इमारत देण्यात येणार असून त्यांच्याकडून या रुग्णालयासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उभारण्यात येणार असल्याची माहिती कडोंमपा आयुक्त डॉ. इंदू राणी जाखड यांनी दिली.

## हनुमान विद्यालयाचे नूतनीकरण

**पनवेल, दि. ९ : प्रतिनिधी**



सातारा जिल्ह्यातील (ता. खटाव) निढळ येथे रयत शिक्षण संस्थेच्या हनुमान विद्यालयाची नूतनीकृत इमारत रायगडचे माजी खासदार आणि रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग काऊन्सिल सदस्य रामशेठ ठाकूर यांच्या ७५ लाख रुपयांच्या देणगीतून उभारण्यात आली आहे. इमारतीचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते झाले. तर वर्गखोल्या, विविध कक्ष, ऑफिस यांचे उद्घाटन रामशेठ ठाकूर यांच्यासह उपस्थित अन्य मान्यवरांच्या हस्ते झाले.

यावेळी त्यांनी विद्यालयाच्या विकासासाठी आणखी २५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. भगीरथ शिंदे, सचिव विकास देशमुख, कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के, आमदार विश्वजित कदम, आमदार शशिकांत शिंदे, माजी आमदार प्रभाकर घार्गे, मॅनेजिंग काऊन्सिल सदस्य प्रभाकर देशमुख, ॲड. रवींद्र पवार, डॉ. सदाशिव कदम, डॉ. विठ्ठल शिवणकर, सांगली दक्षिण विभागीय अध्यक्ष डॉ. एम. बी. शेख, संस्थेचे सहसचिव डॉ. शिवलिंग मेनकुदळे, डॉ. राजेंद्र मोरे, सदस्य वाय. टी. देशमुख, विभागीय अधिकारी नवनाथ जगदाळे, पीआरओ बाळासाहेब कारंडे यांच्यासह पदाधिकारी, रयत सेवक आणि शिक्षक उपस्थित होते.


### ठाणे महानगरपालिका, ठाणे

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**निविदा सूचना**

ठाणे महानगरपालिका, अनुभवी निविदाकारांकडून ‘महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद’ अंतर्गत ठाणे १४८ विधानसभा क्षेत्रातील विविध ठिकाणी शौचालय नुतनीकरण रस्त्यांचे काँक्रिटिकरण करणे व स्थापत्य कामे करणे ०४ (चार) कामांकरीता ई-टेंडरींग पद्धतीने निविदा मागवित आहे. ज्या कंत्राटदारांविरुद्ध शासकिय/निमशासकिय/सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम/स्थानिक स्वराज्य संस्था इ .यांनी शिस्त भंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली/सुरु आहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. कामाची सविस्तर निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे अधिकृत ई-निविदा संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथे दि.१०/०९/२०२४ ते दि. १८/०९/२०२४ रोजी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध असतील सदर निविदा ई-टेंडरींग पद्धतीने दि. १८/०९/२०२४ रोजी १६.०० पर्यंत स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास दि. १९/०९/२०२४ रोजी १६.३० वा उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/सा.बां/४६१/२०२४-२५

दि : ०९.०९.२०२४

plsvisitourofficialweb-site www.thanecity.gov.in

सही/-
कार्यकारी अभियंता
ठाणे महानगरपालिका, ठाणे



### NAGPUR MUNICIPAL CORPORATION
**E-Tender Notice**

Commissioner, NMC invite e-tender for the following work. The details of e-tender can be downloaded by the Registered Contractors of Govt. of Maharashtra Portal **(www.maharashtra.gov.in).** The terms and conditions are available on e-tenders portal **(www.mahatenders.gov.in).** The purchase and submission of e-tenders shall be done through internet.

| Name of the work | Estimate Cost | EMD (in the Name of Executive Engineer Water Works) |
|---|---|---|
| Providing, Laying and Jointing 200 mm dia. HDPE pipeline and water connection for NDRF Academy Project Suradevi, Nagpur. | 3,32,01,589.00 | 1,66,100.00 |

**Note : (1)** EMD :- (Rs. 1,66,100/-) & Cost of Blank Form (including 18% GST):- 3000 + 18% GST = 3540 **(2)** Last date of Sale & Submission for e-tender:- From 11.09.24 to 25.09.24 upto 3.00 pm. **(3)** Date of Opening for e-tender (if possible) :- On 26.09.24 at 4.00 pm. **(4)** Tender Document Submission - one copy online and same should be submitted manually in Water Works(HQ), 4th Floor, New Administrative Building, Mahanagar Palika Marg, Civil Lines, Nagpur.

**Advt No : 452/PR,**
**Dt : 09/09/2024**

**Executive Engineer (Water Works)**
**Public Health Engineering Department**
**Nagpur Mpl.Corporation**


## ‘रास रंग ठाणे २०२४’चे आयोजन

**ठाणे :** ‘क्रेडाई एमसीएचआय ठाणे’तर्फे वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम ‘रास रंग ठाणे २०२४’चे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार, दि. १७ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते ११.३० वाजेपर्यंत भूमिपूजन व ११.४५ ते दुपारी १२.१५ यावेळेत पत्रकार परिषद होणार आहे. ‘रास रंग ठाणे २०२४’ने ठाणे शहराची प्रतिमा उंचावली आहे. रास रंग ठाणेचा हा भव्य उत्सव यावर्षी सातव्या वर्षात पदार्पण करीत असून या कार्यक्रमाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे.

‘रास रंग ठाणे २०२४’ची घोषणा करताना आनंद होत असून बॉलीवूड DHOL सोबत नवरात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. किंग हनीफ अस्लम, गायक उमेश बारोट आणि टीमचा यामध्ये सहभाग असणार आहे. ऑक्ट्रॉय ग्राउंड कोपरी ठाणे, हरिओम नगर जवळ, पूर्व येथे भूमिपूजन व पत्रकार परिषदेचे आयोजन सकाळी १० वाजता एक्स्प्रेस हायवे, ठाणे (प.) येथे करण्यात आले आहे. यावेळी उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यक्ष जितेंद्र मेहता, कार्यक्रमाचे अध्यक्ष मनीष खंडेलवाल, कुसुम शर्मा (सं. ९८३३४५८३२३) यांनी केले आहे.



▶ **नवी मुंबई** : आयुक्त मंगेश चितळे यांनी वडाळा तलाव येथील विसर्जन घाटाला पाहणी भेट दिली. यावेळी उपायुक्त डॉ. वैभव विधाते, लेखाधिकारी संग्राम व्होरकाटे, प्रभाग अधिकारी रोशन माळी, आरोग्य विभाग प्रमुख अनिल कोकरे, विद्युत विभाग प्रमुख प्रीतम पाटील, मुख्य आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड, लायन्स क्लबचे पदाधिकारी व रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

## रक्तदान शिबिराला प्रतिसाद



**बदलापूर :** ‘आदिनाथ दिगंबर जैन प्रतिष्ठान’च्यावतीने पर्युषण पर्वाचे औचित्य साधून त्रिवेणी संगम कात्रप बदलापूर पूर्व येथे रविवार, दि. ८ सप्टेंबर रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात ४० हून अधिक दात्यांनी रक्तदान केले.

पर्युषण पर्वात रक्तदान शिबिराचे आयोजन करून धार्मिक परंपरेसह सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश या माध्यमातून देण्यात आला. चिदानंद चॅरिटेबल ब्लड बँकेचे शिबिरासाठी सहकार्य लाभले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी ‘आदिनाथ दिगंबर जैन प्रतिष्ठान’चे प्रीतम शहा, महावीर दरुरे, योगेश ठोले, नविन हेमावत, चंचलकुमार पंचोरी, संचिता ठोले, इशिता ठोले आदींनी प्रयत्न केले.

## ज्येष्ठा गौरीचे आगमन कधी?

**ठाणे, दि. ९ : प्रतिनिधी**

श्री विघ्नहर्ता गणपतीच्या आगमनासोबत गौरीचे आगमन होत असते. ज्यांच्या घरी गौरीचे आगमन होत असेल, त्यांना गौरीपूजन, तारीख, वेळ, मंत्र आणि विधी यांविषयी पंचांगकर्ते दा. कृ. सोमण यांनी स्पष्ट केले आहे.

मंगळवार दि. १० सप्टेंबर रोजी रात्री ८.०२ वाजेपर्यंत चंद्र अनुराधा नक्षत्रामध्ये राहणार आहे. म्हणून मंगळवार, दि. १० रोजी रात्री ८.०२ वाजेपर्यंत ज्येष्ठा गौरी आणाव्यात. बुधवार, दि. ११ सप्टेंबर रोजी ज्येष्ठा नक्षत्रावर गौरीपूजन करावे. गुरुवार, १२ रोजी रात्री ९.५१ वाजेपर्यंत मूळ नक्षत्रावर गौरींचे विसर्जन करावे. असे पंचांगकर्ते दा. कृ. सोमण यानी सांगितले.

याविषयी अधिक माहिती देताना सोमण म्हणाले की, ज्येष्ठा गौरी म्हणजे गणेशाची माता पार्वती! पार्वतीबरोबर तिच्या सखीचेही पूजन करण्याची प्रथा आहे. काही घराण्यात खड्याच्या गौरी आणतात. काही घराण्यात धान्याच्या राशीवर मुखवटे ठेवून त्यांची पूजा करतात. काही ठिकाणी तेरड्याच्या गौरी पूजतात.

गौरीच्या सणाला सासरी गेलेली मुलगी माहेरी येते. गौरीला १६ प्रकारचे नैवेद्य, १६ प्रकारच्या भाज्या अर्पण करतात.


### ONE GLOBAL SERVICE PROVIDER LIMITED

CIN: L74110MH1992PLC367633

**Reg Office:** 6th Floor, 601 E Wing, Trade Link Building, B & C Block Senapati Bapat Marg, Kamala Mill Compound, Lower Parel (W) Delisle Road, Mumbai, Maharashtra - 400013.
Tel.:8657527323 • E-mail : compliance.1connect@1gsp.in • website: www.1gsp.in

**NOTICE OF 32nd AGM FOR ONE GLOBAL SERVICE PROVIDER LIMITED TO BE HELD THROUGH VIDEO CONFERENCING/OTHER AUDIO VISUAL MEANS.**

Notice is hereby given that the 32nd (Thirty Second) Annual General Meeting of the members of One Global Service Provider Limited will be held on Monday, 30th September, 2024, AT 2:00 P.M. IST through video conferencing/other audio visual means (VC) to transact the businesses as set out in the AGM. The electronic copies of the Notice of AGM and Annual Report for F.Y. 2023-24 have been sent to all the members whose email Ids are registered with the Company/Depository Participant(s) in accordance with the circulars issued by Ministry of Corporate Affairs. The same is also available on the Company's Website.

Members holding shares either in physical form or in dematerialized form, as on the cut-off date of Friday, September 20, 2024 may cast their vote electronically on the Ordinary Business as set out in the Notice of AGM through electronic voting system of NSDL from a place other than venue of AGM ("remote e-voting").All the members are informed that:

- The Ordinary Business as set out in the Notice of AGM may be transacted through voting by electronic means.
- The remote e-voting shall commence on Wednesday, September 25th, 2024 (9:00 a.m. IST)
- The remote e-voting shall end on Sunday, September 29th, 2024 (5:00 p.m. IST)
- The cut-off date for determining the eligibility to vote by electronic means or at the AGM is Friday, September 20, 2024.
- The Register of Members and Share Transfer Books will remain closed from 23rd September, 2024 to 30th September, 2024.
- Any person, who acquires shares of the Company and become member of the Company after dispatch of the Notice of AGM and holding shares as of the cut-off date i.e. Monday, September 23, 2024, may obtain the login ID and password by sending a request at following email id's: evoting@nsdl.co.in or issuer/RTA.

**Members may note that:**

- The remote e-voting module shall be disabled by NSDL after the aforesaid date and time for voting and once the vote on a resolution is cast by the member, the member shall not be allowed to change it subsequently;
- The members who have cast their vote by remote e-voting prior to the AGM may also attend the AGM but shall not be entitled to cast their vote again;
- A person whose name is recorded in the register of members or in the register of beneficial owners maintained by the depositories as on the cut-off date shall be entitled to avail the facility of remote e-voting. The notice of AGM is available on the Company's website http://www.1gsp.in/ and also on the NSDL's website www.evoting.nsdl.com; and in case of queries, members may refer to the Frequently Asked Questions (FAQs) for members and e-voting user manual for members at the Downloads Section of www.evoting.nsdl.com, or email at evoting@nsdl.co.in, Tel: 1800-222-990 or contact Ms. Megha Chitre, Company Secretary and Compliance Officer of the company, at 1connect@1gsp.in, Contact No: 8758706408 who will also address grievances connected with the voting by electronics means.
- As you may be aware that the Board of the Company has recommended a final dividend of Rs. 1/- per share for the year 2023-24. The same would be paid to the members after declaration at the AGM within the stipulated period. Members may note that the Income Tax Act, 1961, as amended by the Finance Act, 2020, mandates that dividends paid or distributed by a Company is taxable in the hands of members. The Company shall therefore be required to deduct tax at source ("TDS") at the time of making the payment of dividend. In order to enable us to determine the applicable TDS rate, members are requested to submit the relevant documents on or before Monday, September 16, 2024. The detailed communication regarding TDS on dividend is provided on the link https://1gsp.in/info/about-us.aspx overview.

Date: 07.09.2024
Place: Mumbai

**For, One Global Service Provider Limited**
**Sd/-Megha Chitre**
**Company Secretary and Compliance Officer**



### AVIVA INDUSTRIES LIMITED

CIN: L51100MH1984PLC034190

**Reg Office:** 4th Floor, Jaya Talkies, S. V. Road, Opp. Indraprastha, Borivali (W). Mumbai-400092
**Corp. Office:** C-3/1001, Anushruti Tower, Near Jain Temple, Opp. New York Tower, Nr. Thaltej Cross road, S.G Highway Ahmedabad 380054.
E-mail: aviva.amd@gmail.com • website: www.avivaindustries.com

**NOTICE OF 40th AGM FOR INDRA INDUSTRIES LIMITED TO BE HELD THROUGH VIDEO CONFERENCING/OTHER AUDIO VISUAL MEANS.**

Notice is hereby given that the 40th (Forty) Annual General Meeting of the members of Aviva Industries Limited will be held on Saturday, 28th September, 2024, at 12:00 P.M. IST through video conferencing/other audio visual means (VC) to transact the businesses as set out in the AGM. The electronic copies of the Notice of AGM and Annual Report for F.Y. 2023-24 have been sent to all the members whose email Ids are registered with the Company/Depository Participant(s) in accordance with the circulars issued by Ministry of Corporate Affairs. The same is also available on the Company's Website.

Members holding shares either in physical form or in dematerialized form, as on the cut-off date of Friday, September 20, 2024 may cast their vote electronically on the Ordinary Business and Special Business as set out in the Notice of AGM through electronic voting system of NSDL from a place other than venue of AGM ("remote e-voting").All the members are informed that:

- The Ordinary Business as set out in the Notice of AGM may be transacted through voting by electronic means.
- The remote e-voting shall commence on Wednesday, September 25th, 2024 (9:00 a.m. IST)
- The remote e-voting shall end on Friday, September 27th, 2024 (5:00 p.m. IST)
- The cut-off date for determining the eligibility to vote by electronic means or at the AGM is Friday, September 20, 2024.
- The Register of Members and Share Transfer Books will remain closed from 21th September, 2024 to 28th September, 2024.
- Any person, who acquires shares of the Company and become member of the Company after dispatch of the Notice of AGM and holding shares as of the cut-off date i.e. Friday, 20th September, 2024, may obtain the login ID and password by sending a request at following email id's: evoting@nsdl.co.in.com or issuer/RTA.

**Members may note that :**

- The remote e-voting module shall be disabled by NSDL after the aforesaid date and time for voting and once the vote on a resolution is cast by the member, the member shall not be allowed to change it subsequently;
- The members who have cast their vote by remote e-voting prior to the AGM may also attend the AGM but shall not be entitled to cast their vote again;
- A person whose name is recorded in the register of members or in the register of beneficial Owners maintained by the depositories as on the cut-off date shall be entitled to avail the facility of remote e-voting. The notice of AGM is available on the Company's website aviva.amd@gmail.com. and also on the NSDL's website www.evoting.nsdl.com .and in case of queries, members may refer to the Frequently Asked Questions (FAQs) for members and e-voting user manual for members at the Downloads Section of www.evoting.nsdl.com, or email at www.evoting.nsdl.com Tel: 1800 1020 990 or contact Mr. Bharvin Patel, Managing Director and of the company, at aviva.amd@gmail.com, Contact No. +91-79-26856515/16 who will also address grievances connected with the voting by electronics means.

Date: 07.09.2024
Place: Ahmedabad

**For AVIVA INDUSTRIES LTD.**
**BHARVIN PATEL**
MANAGING DIRECTOR
**DIN: 01962391**


# गौराईच्या स्वागतासाठी रानफुलांनी बहरले डोंगर

**आनंद जाधव**
**पेण, दि. ९ :**

विकासाची नवनवीन क्षितिजे गाठणारा पेण तालुका पावसाळ्यात अतिशय लोभस दिसतो. पेण येथील महाल मिऱ्या डोंगर, कासमाळ, पाबळ खोरे, गोविर्ला फाटा, घोटे, वरसई येथील डोंगर कपारीतील रानमाळ सुंदर अशा विविध फुलांनी बहरतो. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून पर्यटकांचे पाय पेणकडे वळू लागले आहेत.



पावसाळ्याच्या दिवसांत पेण परिसरातील रानफुलांना चांगलाच बहर येतो. माळरानावर रंगीत गवतफुलांचा सडा पसरतो. यंदाही संततधार पडणारा पाऊस, निर्सगरम्य वातावरणातील गारवा, त्यातच रंगीत फुलांची माळ पर्यटकांना आकर्षित करीत आहे.

तालुक्यातील माळराने विविध फुलांनी बहरली आहेत. पेण परिसरातील शहरीकरण पाहता, हिरवेगार निसर्गरम्य वातावरण दुरापास्त झाले असे वाटत असतानाच ग्रामीण भागात दिसणारे रम्य वातावरण सर्वांचे मन मोहून घेत आहे. निसर्गाची हिरवी शाल पाहून मन आनंदित होत आहे. निसर्गाचा अनोख्या पातळीवरचा अलौकिक ठेवा असलेल्या नैसर्गिकरित्या गौरीचे स्वागत करण्यासाठी हिरवाईवर चवर, दीपकाडी, सोनकी, गेंद, नीलिमा, कापरू, तेरडा आदी प्रकारच्या रानफुलांचे दर्शन घडू लागले आहे.



पेण परिसरातील माळराने फुलांनी बहरून गालीचा पसरल्यासारखे भासू लागले आहे. पावसाळ्यापूर्वी उन्हाच्या झळा सोसून रखरखीत भासणारा प्रदेश हिरवाईने नटला आहे. या परिसराचा ताबा तेरड्या जांभळ्या फुलांनी घेतला असून पर्यटकांना आकर्षित करू लागला आहे. गेल्या काही महिन्यांपासून परिसरात मोठ्या प्रमाणावर पर्यटन वाढले आहेत. सातारा येथील कास पठाराच्या धर्तीवर कासमाळ, बोरगाव पाचगणीया क्षेत्राचा विकास करावा, अशी मागणी पर्यावरणप्रेमींकडून करण्यात येत आहे. शिवाय या परिसराचा विकास झाला, तर येथील खेड्यापाड्यांतील वनवासी व गोरगरीब नागरिकांसाठी आर्थिक दरवाजे खुले होतील, अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे.

> “डोंगरावर विविध गवतफुले, रानफुले बहारली आहेत. उरणच्या डोंगरावर रानफुलांचा पावसाळ्यातील बहर ही नैसर्गिक देणगी आहे. विविध रंगांची ही फुले लक्ष वेधतात. या निसर्गसंपन्न भागांचे संवर्धन करायला हवे.
>
> **– आशालता पारधी, निसर्गप्रेमी**

### विहंगम दृश्य डोंगरांवर

श्रावणात व भाद्रपद महिन्यात विविध धार्मिक सण असतात. त्यामुळे पेण परिसरात पत्री म्हणून याच फुलांचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. तेरडा, हळदीकुंकू, पिवळी, माक्याचे फूल, अग्नीफुले आदी फुले मुबलक प्रमाणात डोंगरावर बहरतात. अतिशय विहंगम दृश्य डोंगरांवर दिसून येते. गेंद, सोनकी, जांभळा तेरडा, चवर फुले आदी फुलांनी गौराईचे स्वागत केले जाते. पारंपरिक पद्धतीच्या सजावटीसाठी रानमाळावरील या फुलांचा वापर केला जातो. आदिवासी भगिनी मोठ्या प्रमाणावर या फुलांच्या माळा बाजारात विक्रीसाठी घेऊन येतात.कासमाळ, वरवणे, हेटवणे या ठिकाणी वनस्पतींबरोबरच पर्यटकांसाठी छोटे-मोठे झरे, धबधबे हेही परिसराचे महत्त्व वाढवतात. पुष्पवैभव डोळ्याचे पारणे फेडणारे आहे.


### जाहीर सूचना

सूचना ह्याद्वारे सर्व जनतेच्या माहितीसाठी देण्यात येत आहे की श्री.शैलेश सुधाकर चासकर हे एल.टी. रोड मुलुंड (पूर्व), मुंबई ४०००८१ येथे वसलेल्या सुकृती अपार्टमेंट कॉ-ऑपरेटिव्ह हौ. सो. लि. मधील सुकृती अपार्टमेंटच्या ए विंगच्या ६ व्या मजल्यावरील ३४० चौ. फू. चटई क्षेत्रफळ असलेल्या धारण केलेल्या सदनिका क्र. २२ चे मालक आहेत. (ह्यानंतर संक्षेपामध्ये नमूद सदनिका असा संदर्भ असलेले)

माझे अशील नमूद सदनिका खरेदी करू इच्छित असून नमूद सदनिका किंवा त्याच्या कोणत्याही भागावर गहाण, भेटवस्तू, विक्री, ताबा, वारसा, भाडेपट्टा, परवाना, धारणाधिकार, देवाणघेवाण याद्वारे कोणताही दावा करणाऱ्या सर्व व्यक्ती, सरकारी अधिकारी, बँक/का, वित्तीय संस्था इ. , देखभाल, प्रभार, ट्रस्ट, करार, वाटा, सुलभता किंवा इतर कोणत्याही प्रकारे किंवा जे काही आवश्यक असेल ते २०२, पुष्कराज कॉ-ऑप. हौ. सो. लि. नवघर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०००८१ येथील त्यांच्या कार्यालयात निम्नस्वाक्षरीकाराना लेखी कळवावे सदर दिनांकापासून १४ दिवसांच्या आत कळवावे आणि असे न झाल्यास असे कोणतेही दावे नाहीत आणि/किंवा असे मानले जाईल आणि जर असेल तर ते माफ केले गेले आहेत किंवा सोडून दिले आहेत असे गृहित धरले जाईल.

सही/-
(दर्शना एम. द्रविड)
वकील, उच्च न्यायालय



### बृहन्मुंबई महानगरपालिका

**के. ई. एम. हॉस्पिटल**

**ई-प्रापण दरपत्रक सूचना**

**केईएम/६७/एमएसटी/२४ (ई-निविदा)**

बृहन्मुंबई महानगरपालिका चे आयुक्त खालील ऑन लाईन ई-निविदा मागवित आहेत. दरपत्रक प्रत बृमनपा पोर्टल (http://www.mcgm.gov.in) वरील “कोटेशन-अदर्स” विभागामधून डाऊनलोड करता येतील. तथापि बोली महाटेंडर पोर्टल (https://mahatenders.gov.in) द्वारे मागविता येतील.

| अनु. क्र. | वर्णन | ई-दरपत्रक छाननी शुल्क | इरठे | ऑन लाईन बोली सादरीकरण सुरु दिनांक आणि वेळ | ऑन लाईन बोली सादरीकरण समाप्तीसाठी शेवटचा दिनांक आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | बृमनपाच्या केईएम हॉस्पिटल करिता टॅब पॅनाक्रोझोले ४० एमजी (१००००० स्ट्रिपस) ची खरेदी. ई-निविदा आयडी : २०२४_एमसीजीएम_१०८१२८४_१ | १३२०/- + १८% जीएसटी | २०,००० | ११.०९.२०२४ (१५:०० वा.) | २०.०९.२०२४ १५:०० वा. |
| २ | बृमनपाच्या केईएम हॉस्पिटलच्या मायक्रो बायलॉजी विभागाकरिता पीसीआर एमप्लीफिकेशन किट्सची खरेदी. ई-निविदा आयडी – २०२४_एमसीजीएम_१०८१२८०_१ | १३२०/- + १८% जीएसटी | २०,००० | ११.०९.२०२४ (१५:०० वा.) | २०.०९.२०२४ १५:०० वा. |
| ३ | बृमनपाच्या केईएम आयव्हीएफ रिंगर लॅकटेटे (१८१०० बॉटल) ई-निविदा- आयडी : २०२४_एमसीजीएम_१०८१२६७_१ | १३२०/- + १८% जीएसटी | २०,००० | ११.०९.२०२४ (१५:०० वा.) | २०.०९.२०२४ १५:०० वा. |
| बोलीदारांनी नोंद घ्यावी की लिफाफा ए आणि बी उघडल्यानंतर ताबोडतोब आणि लिफाफा ‘सी’ उघडण्यापूर्वी कोणत्याही वॉर्ड सिटीझन्स फॅसिलिटेशन सेंटर (सीएफसी) येथील मेडिकल स्टोअर, केईएम हॉस्पिटलमधून घेऊन भरणा करावा. उपरोक्त नमूद छाननी शुल्कामध्ये कोणताही बदल झाल्यास बोलीदाराना बदलेल्या छाननी शुल्काचा भरणा करावा लागेल. | | | | | |

निविदा कागदपत्रे बृमनपा पोर्टल (https://portal.mcgm.gov.in) वर निविदा सूचनेसह उपलब्ध आहे. तथापि बोली महाटेंडर पोर्टल (https://mahatenders.gov.in) द्वारे मागविण्यात येत आहेत. निविदाकारांनी, सदर विषयाच्या संदर्भात कोणतेही शुद्धिपत्रक जारी केले असल्यास केवळ महाटेंडर संकेतस्थळ आणि बृमनपा पोर्टलवरच प्रसिद्ध करण्यात येईल. स्थानिक वृत्तपत्रामध्ये शुद्धिपत्रक प्रसिद्ध करण्यात येणार नाही.

पीआरओ/१२१८/जाही/२०२४ - २५

सही/-
अधिष्ठाता, के. ई. एम. हॉस्पिटल

झाडे लावा, झाडे जगवा



### निवेदन

मुंबई तरुण भारतमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिराती या जाहिरातदारांनी दिलेल्या मजकूरानुसार प्रसिद्ध होत असतात. जाहिरातदारांबरोबर अथवा व्यक्तींबरोबर केलेल्या कोणत्याही व्यवहारामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान वा हानी झाल्यास त्याबाबत मुंबई तरुण भारत जबाबदार राहणार नाही. आमच्या वाचकांना नम्र विनंती की, त्यांनी जाहिरातदारांबरोबर कोणतेही व्यवहार करण्यापूर्वी योग्य ती खबरदारी घ्यावी.